## अर्ज निशाणी क्र.५ वर आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी सादर केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मागितला की, प्रतिवादींनी अर्ज क्र. रस्ता/एस.आर/१२/२०२० मधील मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय दि.०७.१०.२०२२ च्या आधारे दावा मिळकतीमधून रस्ता निर्माण करु नये व वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये.

२. **दावा मिळकतीः**

मौजे नागेवाडी, ता.खानापूर, जि.सांगली येथील जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

| **अ.क्र.** | **गट नं.** | **क्षेत्र हे.आर.** | **आकार रु.पैसे** |
|---|---|---|---|
| १. | २४८ | ०–१० | ०.३१ |
| २. | २५० | ०–३४ | १–०९ |
| ३. | २४४/२ | १–६० पो.ख. ०–०३ | ५–७७ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत झाडझुड, दगडमाती, लाकूडफाटा इत्यादी तदंगभूत वस्तुसह तसेच दावा कलम १ मधील अ.क्र.१ मधील विहीर इत्यादी सर्व हक्कासह व इजमेंटचे हक्कासह.

(उपरोक्त मिळकतीस यापुढे '**दावा मिळकत**' असे संबोधले आहे.)

३. वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी क्र.६ ते १० यांची वाडवडिलार्जित मालकी व वहिवाटीच्या आहेत. वादींचे पूर्वहक्कदार यांचेपासून दावा मिळकती हया शांततामय, अव्याहत, निरंतर मालकीने कब्जे वहिवाटीस होत्या व आहेत. दावा मिळकत अ.क्र.१ मध्ये वादींची समाईकातील विहीर आहे. दावा कलम १ ही विहीर वसला असून त्यामधून कधीही रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही.

४. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मा.तहसिलदार यांचेकडे लबाडीने रस्ता केस/एस.आर./१२/२०२० वादी व प्रतिवादी क्र.६ ते १० यांचेविरुध्द दाखल केला. सदर रस्ता केस कामी वादी व प्रतिवादी क्र.६ ते १० यांनी रितसर म्हणणे देऊन रस्ता अस्तित्वात नसल्याचे तहसिलदार विटा यांचे निदर्शनास आणून दिले होते.

५. वादींनी असे कथन केले की, तहसिलदार विटा यांनी रस्ता केस क्र.१२/२०२० चे कामी दि.२३.०९.२०२१ रोजी स्थळपाहणी केली. त्यावेळी गट क्र.२५० मध्ये रस्ता अस्तित्वात आलेला नव्हता व नाही. तसेच सदर स्थळपाहणी वेळी वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना त्यांचे मिळकतीत जाणेयेणेसाठी गट क्र.२४९ व २५१ मधून रस्ता उपलब्ध असल्याचे निदर्शनास आणून दिले होते व तसे स्थळपाहणी अहवालामध्ये नमूद करणेची विनंती वादी यांनी केली होती. तहसिलदार यांनी वस्तुस्थितीप्रमाणे पंचनामा केला नसल्याने वादी यांनी पंचनाम्यावर सहया केल्या नाहीत. वादी यांनी दि.३०.११.२०२१ रोजी फेर स्थळपाहणीसाठी अर्ज दाखल केला होता. परंतु सदरचा अर्ज सबळ कारणाशिवाय फेटाळला गेला.

६. वादींनी असे कथन केले की, तहलिसदार विटा यांनी रस्ता केस/एस.आर/१२/२०२० चे कामी वादी यांचे म्हणणे व दिलेले सबळ पुरावे

विचारात न घेता दि.०७.१०.२०२२ रोजी प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर केला. सदर अर्ज मंजूर झालेनंतर प्रतिवादी क्र.१ ते ५ हे ''निकाल आमच्या सारखा झाला आहे त्यामुळे दावा मिळकतीतून १० फुटाचा रस्ता काढणाराच कोण आडवे येतय ते पाहतोच'' अशी दांडगाव्याची भाषा वादी यांना वापरलेली आहे. वादी क्र.१ ते ३ हे वयोवृध्द असून त्यांना कोणाचेही पाठबळ नाही. प्रतिवादी हे आडदांड व राजकीय पाठबळ असणारे आहेत. प्रतिवादी हे रस्ता/एस.आर/१२/२०२० चे दि.०७.१०.२०२२ रोजीचे निकालाचे आधारे वादी यांचे ऊसाचे खोडव्याचे आठ महिन्याचे पिकातून व ऊसाचे लागणीचे पिकातून व विहीरीचे क्षेत्रातून रस्ता काढलेशिवाय राहणार नाही. त्यामुळे वादी यांना त्यांचे क्षेत्रास मुकावे लागणार आहे व ऊस पिकाचे नुकसान होऊन वादीचे कशानेही न भरुन येणार अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी असा १० फुटाचा रस्ता निर्माण केलेस मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिडींगला सामोरे जावे लागणार आहे. म्हणून वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

७. प्रतिवादी क्र.१ ते ५ प्रस्तुत दाव्यात हजर झाले व **निशाणी ३१** येथे त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. प्रतिवादींनी अर्ज निशाणी ५ मधील कथनांचे खंडण केले. त्यांनी असे कथन केले की, वादींचा दावा व अर्ज निशाणी ५ खोटे आहेत. मा.तहसिलदार यांनी दिलेला निकाल बरोबर व कायदेशीर आहे.

८. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, जमीन मिळकत गट क्र.२४५, २४६, २४७ कडे दक्षिणोत्तर जाणारा व गट क्र.२४८ मध्ये असणारे विहीरीकडे व म्हसोबा मंदिराकडे जाणारा पूर्वापार १० फूट रुंदीचा बैलगाडी रस्ता होता. सदर रस्ता वादी यांनी ऊसाचे जादा सऱ्या काढून व त्यामध्ये ऊसाची लागण करुन रस्त्यामध्ये अडथळा निर्माण केला. म्हणून प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी तहसिलदार, विटा यांचेकडे अडथळा दूर होऊन मिळणेकरीता रस्ता केस दाखल केली होती.

सदर केस कामी वादी यांनी हजर राहून लेखी युक्तिवाद दिला होता.दावा मिळकतीपैकी गट क्र.२४८ हा विहीरीचा गट असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची सामाईक पाणी पाजण्याची पाळी ठरलेली आहे. सदर विहीरीवर पाणी पाजणेसाठी पूर्वी मोटेचा वापर केला जात असे. सदरची मोट चालविणेसाठी बैलांचा वापर केला जात असे त्यासाठी सदरचा रस्ता सोडलेला होता व आहे. तसेच गट क्र.२४७ मध्ये म्हसोबा मंदिर असून वादी व प्रतिवादी व त्यांचे पूर्वहक्कदार हे वर्षानुवर्षे पूजा अर्चा करीत होते व सदर रस्त्याचा वापर हे देवाची यात्रा करीत होते व आहेत.

९. वादी यांनी सदर रस्ता ऊसाच्या सऱ्या काढून ऊसाची लागण करुन तो रस्ता अरुंद केला आहे. वादी यांनी केलेल्या अडथळयामुळे प्रतिवादी यांना त्यांचे शेतामध्ये ये–जा करणेसाठी अगर मेहनत मशागत करणेसाठी पीक घेणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे त्यांनी तहसिलदार यांचेकडे रस्ता केस दाखल केलेनंतर तहसिलदारसाो, विटा यांनी सदर रस्त्याची स्थळ पाहणी करुन खरी वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना भाग्यनगर रस्त्यास मिळणेसाठी नमूद केलेल्या रस्त्याव्यतिरिक्त रस्ता उपलब्ध नसल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. वादी यांनी सदर रस्त्यास हरकत अडथळा केला असल्याचे देखील नोंदविले आहे.

१०. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादी यांचे गट क्र.२४४/२ व गट क्र.२५० चे सरबांधावरुन रस्ता अस्तित्वात असताना त्यांना नवीन रस्ता निर्माण करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रतिवादींना त्यांचे मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी उपरोक्त रस्त्याव्यतिरिक्त अन्य सोयीस्कर रस्ता नाही. वादींनी दाखल केलेला तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांना त्यांचे मिळकतीमध्ये जाणे येणेस मुश्कील होणार आह तसेच विहीरीवर जाणे–येणे अडचणीचे होऊन पिकांना पाणी देणे कठीण होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांचे शेत पडीक राहणेची शक्यता निर्माण होणार आहे. प्रतिवादी यांची मोठी हार्डशीप होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर

झाल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**११.** दिनांक ०३.०१.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.४ पारुबाई आत्माराम सातपुते यांनी **निशाणी ४८** येथे अर्ज दाखल करुन असे कथन केले की, त्या उपचारासाठी मुंबई येथे असतात. प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ हे एकमिलाफी असुन त्यांनी संगणमत करुन प्रतिवादी क्र.४ यांच्या गैरहजेरीमध्ये अज्ञात व्यक्तीस प्रतिवादी क्र.४ यांच्या नावे उभे करुन व प्रतिवादी क्र.४ प्रत्यक्ष उपस्थित आहे असे लबाडीने भासवुन प्रतिवादी क्र.४ यांच्या संमती शिवाय मा.तहसिलदारसोा खानापूर यांच्याकडे रस्ता केस एस.आर./१२/२०२० दाखल केला. त्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.४ यांना अर्जदार क्र.४ करण्यात आलेले आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.४ सदरच्या रस्ता केस कामी कधीही हजर राहिलेली नव्हती तसेच कोणत्याही कागदपत्रावर अंगठा उमठवलेला नव्हता अगर नाही. प्रतिवादी क्र.४ यांनी कोणत्याही रस्त्याची मागणी तहसिलदारसोा खानापूर यांच्याकडे केली नव्हती व नाही. प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ यांनी रस्ता केस एस.आर./१२/२०२० च्या निकालावर मा.दिवाणी न्यायालयामध्ये कॅव्हेट अर्ज व उप विभागीय अधिकारीसोा, विटा यांच्या न्यायालयात कॅव्हेट अर्ज दाखल केले. दोन्ही कॅव्हेट अर्जावर अर्जदार क्र.४ म्हणुन प्रस्तुत प्रतिवादी क्र.४ यांना समाविष्ट करुन अन्य व्यक्तीचा अंगठा हा प्रतिवादी क्र.४ यांचा अंगठा आहे असे भासवुन अंगठा उमठविलेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.४ यांनी कोणाही विरुध्द कॅव्हेट अर्ज दाखल केलेले नव्हते व नाही.

**१२.** प्रतिवादी क्र.४ यांनी अर्ज निशाणी ४८ मध्ये पुढे असे कथन केले की, प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ यांनी प्रस्तुत दावा क्र.५१८/२०२२ मध्ये संगणमत करुन अज्ञात व्यक्तीस उभा करुन व ती व्यक्ती प्रतिवादी क्र.४ आहे असे लबाडीने भासवुन प्रतिवादी क्र.४ यांचे तर्फे वकीलपत्र, पत्तामेमो वर खोटे अंगठे उमटवुन

न्यायालयात दाखल केले आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचे कामी **निशाणी ३१** प्रमाणे प्रतिवादी क्र.४ यांची कैफियत व म्हणणे दिलेले असुन त्यावरती देखील प्रतिवादी क्र.४ हजर आहे असे भासवुन अज्ञात व्यक्तीने अंगठे उमटवुन सदरचे अंगठे प्रतिवादी क्र.४ यांचेच आहे असे भासविले व याप्रमाणे प्रस्तुत न्यायालयाची व प्रतिवादी क्र.४ यांची फसवणुक व दिशाभुल केली आहे. प्रतिवादी क्र.४ यांनी असे कथन केले की, **निशाणी ३१** वरील कैफियत ही प्रतिवादी क्र.४ यांच्यावर बंधनकारक नाही. प्रतिवादी क्र.४ यांनी अर्ज **निशाणी ४८** मध्ये असे कथन केले की, त्या पुन्हा कैफियत दाखल करण्याचे अधिकार राखुन ठेवत आहेत.

**१३.** प्रतिवादी क्र.४ यांनी नंतर **निशाणी ७९** येथे त्यांचे तर्फे स्वतंत्र कैफियत व म्हणणे सादर केले आहे. त्यांनी सदरील कैफियत व लेखी म्हणणे मध्ये असे कथन केले की प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी केलेल्या रस्ता केस एस.आर./१२/२०२० मध्ये प्रस्तुत प्रतिवादी क्र.४ केव्हाही अर्जदार म्हणुन सामील नव्हत्या. त्या अर्जातील कथनाशी या प्रतिवादी सहमत नाहीत. वाद मिळकतीतून कोणताही रस्ता केव्हाही अस्तित्वात नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.४ यांनी कैफियत व लेखी म्हणणे **निशाणी ७९** मध्ये अशी विनंती केली की, वादींनी दाखल केलेला दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजुर करणेत यावा आणि या प्रतिवादीच्या शेतजमिनीतुन कोणत्याही प्रकारचा रस्ता करण्यात येऊ नये.

**१४.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.यु.शेटे व प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ यांचे तर्फे विधीज्ञ श्री.व्ही.पी.तांदळे यांचा युक्तीवाद ऐकला. पुरेशी संधी असताना देखील प्रतिवादी क्र.४ तर्फे प्रस्तुत अर्जावर कोणतेही युक्तीवाद करण्यात आले नाहीत त्यामुळे आदेश दि.०६.०२.२०२४ अन्वये प्रस्तुत अर्ज अंतिम आदेशासाठी राखीव ठेवण्यात आला.

**१५.** अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसे सहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांना या कामी प्रथम दर्शनी केस आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| २. | सोयीचा समतोल (Balance of convenience) वादी यांचे बाजूने आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| ३. | तूर्तातूर्त मनाई आदेश न झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| ४. | काय आदेश ? | **....अर्ज मंजूर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

**१६.** तूर्तातूर्त मनाई आदेश मिळविण्यासाठी मा.तहसिलदार, खानापूर यांचे न्यायनिर्णय प्रथमदर्शनी चुकीचे असल्याचे दर्शविणे व सिध्द करणे वादी यांचेवर बंधनकारक आहे.

**१७.** वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.यु.शेटे यांनी असा युक्तिवाद केला की, मा.तहसिलदार यांचे आदेश/न्यायनिर्णय दि.०७.१०.२०२२ हे प्रथमदर्शनी

बेकायदेशीर व चुकीचे आहे. मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्टच्या तरतुदीनुसार प्रकरण चालविले नाही व सदरील कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करुन बेकायदेशीर न्यायनिर्णय पारीत केला. त्यांनी पुढे असे युक्तीवाद केले की, मा.तहसिलदार यांनी न्यायनिर्णयामध्ये स्थळ निरीक्षण अहवाल दि.२३.०९.२०२१ वर भिस्त ठेवली आहे परंतु शेत जमीन गट क्रमांक २४४/२ व गट क्रमांक २५० यामधील दक्षिण उत्तर रस्ता आहे असे सदरील स्थळ निरीक्षण अहवाल/टिप्पणी वरुन स्पष्ट होत नाही. सदरील स्थळ निरीक्षण अहवाल/टिप्प्णीचे अवलोकन केल्यावर असे स्पष्ट होते की, जमीन गट क्र.२४४/२ व २५० यामध्ये दक्षिण–उत्तर बांध दिसुन आला. सदरील दोन्ही जमिनीमध्ये दक्षिण–उत्तर रस्ता आहे असे स्थळ निरीक्षण अहवाल/टिप्पणीमध्ये नमुद नाही. मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट मधील तरतुदी प्रमाणे कोणताही पुरावा घेतला नाही व यातील वादींना साक्षीदारांच्या उलटतपासाची संधी दिली नाही. उपरोक्त सर्व कारणांमुळे मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय बेकायदेशीर आहे.

१८. वादींचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, मामलेदार कोर्ट ॲक्ट च्या तरतूदीनुसार कार्यवाही न झाल्यामुळे मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय बेकायदेशीर आहे. याकरीता त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे खालील न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली.

१) ***एकनाथ पुंजाजी घुबे विरुध्द डेपुटी कलेक्टर / सब डिव्हीजनल ऑफिसर बुलढाणा व इतर , रिट याचिका क्र.११३०/२०२०,***

२) ***मनोहर दामोधर पाटील विरुध्द सब डिव्हीजनल ऑफिसर (रेव्हेन्यु) लॉज (बॉम्बे ) २००८ २ ३६०,***

३) ***बाबूराव मारुती सावंत विरुध्द हनुमंत याडा नाईक व इतर, रिट याचिका क्र.२०८६/२०१३ .***

**१९.** प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्टच्या तरतुदींप्रमाणे सुनावणी घेऊन व दोन्ही पक्षकारांना योग्य संधी देऊन योग्य न्यायनिर्णय पारित केले आहे. स्थळनिरीक्षण अहवाल/टिप्पणीच्या आधारे न्यायनिर्णय देण्यात आले आहे व ते कायदेशीर आहे. प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की,मामलेदार यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द दावा दाखल करता येत नाही व कोणतीही दाद मागता येत नाही. उपरोक्त कारणामुळे प्रस्तुत दावा व प्रस्तुत अर्ज या न्यायालयात चालू शकत नाही.

**२०.** वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.यु.शेटे यांनी असा युक्तीवाद केला की, मामलेदार यांच्या आदेशाविरुध्द दिवाणी न्यायालयात दावा चालू शकतो. याकरीता त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***उद्धव माधवराव उर्फ महादू सोलंकी विरुध्द रामाप्पा दगडाप्पा जातोडे, लॉज (बॉम्बे ) २००८ ८ ४९१*** वर भिस्त ठेवली. उपरोक्त न्यायनिर्णयाचे मी अवलोकन केले आहे. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये असे निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत की, मामलेदार यांच्या आदेशाविरुध्द दिवाणी न्यायालयात जाहीर ठरावाचा व निरंतर मनाई हुकुमाचा दावा चालू शकतो. उपरोक्त निष्कर्षाप्रमाणे प्रतिवादींतर्फे उपस्थित करण्यात आलेला आक्षेप प्रथमदर्शनी अयोग्य आहे असे माझे मत आहे.

**२१.** मी अभिलेखाचे अवलोकन केले आहे. प्रतिवादी यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ कलम ५ अन्वये दाखल केलेले अर्ज **(निशाणी १६)** वरुन ही बाब स्पष्ट होते की, सदरील अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. तथाकथित वादग्रस्त रस्ता केव्हापासुन अस्तित्वात आहे व अडथळा कोणत्या तारखेला निर्माण करणेत आला ही बाब प्रतिवादींनी सदरील अर्जात स्पष्टपणे नमूद केली नाही. तथाकथित रस्ता व वहिवाट केंव्हापासून अस्तित्वात आहे हे देखील सदरील अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद

नाही.

२२. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादींनी मा.तहसिलदार यांच्याकडे दाखल केलेल्या रस्ता केस मधील अर्ज **(निशाणी १६)** मध्ये असे कथन केले आहे की, वादींनी वहिवाटीचा रस्ता ऊस लागण करते वेळी पूर्व–पश्चिम चालीने दोन्ही बाजूने दोन ते तीन स–या काढून मुजविलेला आहे. स्थळ पाहणी अहवाल/टिप्पणीमध्ये वादींनी दोन ते तीन स–या काढून रस्ता मुजविलेला आहे किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. याउलट स्थळ निरीक्षक अहवाल/टिप्पणी मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, जमीन गट क्र.२४४/२ व गट क्र.२५० मधील दक्षिण–उत्तर बांध साधारणतः ४ ते ५ फुट असल्याचे दिसुन येते. जमीन गट क्र.२४४/२ व गट क्र.२५० मध्ये दक्षिण–उत्तर रस्ता आहे असे दिसुन आल्याचे स्थळ निरीक्षण अहवाल/टिप्पणी मध्ये नमुद नाही. रस्ता केस मधील अर्ज **(निशाणी १६)** मध्ये विनंती 'अ' मध्ये प्रतिवादींनी वादग्रस्त दक्षिण–उत्तर चालीचा रस्ता १० फुट रुंदीचा आहे असे नमुद केले आहे परंतु स्थळ निरीक्षण अहवाल/टिप्पणीमध्ये तथाकथित रस्त्याची रुंदी किती आहे याबाबत देखील कोणताही ऊहापोह करण्यात आला नाही. असे असताना मा.तहसिलदार यांनी तथाकथित रस्त्यामधील तथाकथित अडथळा दुर करण्याचे आदेश पारित केले आहेत.

२३. मा.तहसिलदार यांनी त्यांच्या न्यायनिर्णयामध्ये पान क्र.४ वर दावा दाखल करण्याचे कारण घडल्यापासुन ६ महिन्याच्या आत दावा दाखल केलेला आहे काय? या मुद्दयावर होकारार्थी निष्कर्ष नोंदविला आहे परंतु न्यायनिर्णयामध्ये मा.तहसिलदार यांनी उपरोक्त मुद्यावर कोणतीही कारणमिमांसा अथवा विश्लेषण नोंदविलेले नाही. मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, त्यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये कोणताही तोंडी पुरावा नोंदविला नाही.

यावरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील तरतूदीनुसार प्रकरणाची सुनावणी घेतली नाही.

२४. मा.मुंबई उच्च न्यायालयाने ***मनोहर दामोधर पाटील विरुध्द सब डिव्हीजनल ऑफिसर (रेव्हेन्यु) लॉज (बॉम्बे ) २००८ २ ३६०*** मध्ये असे निष्कर्ष नोंदविले आहेत की, मामलेदार यांनी तोंडी पुराव्याचा विचार करुन न्यायनिर्णय पारित करणे आवश्यक होते परंतु तसे न झाल्यामुळे मामलेदार यांचा आदेश रद्द बातल करण्यात येत आहे. ***बाबूराव मारुती सावंत विरुध्द हनुमंत याडा नाईक व इतर, रिट याचिका क्र.२०८६/२०१३*** मध्ये असा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे की, मामलेदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ अन्वये दाखल अर्जाला तिच प्रक्रिया लागु आहे जी प्रक्रिया दिवाणी दाव्याला लागु असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये रस्ता केस एस.आर./१२/२०२० चा निकाल देताना मा.तहसिलदार/मामलेदार यांनी कोणताही तोंडी पुरावा नोंदविलेला नाही. उपरोक्त कारणामुळे ***मनोहर दामोधर पाटील विरुध्द सब डिव्हीजनल ऑफिसर (रेव्हेन्यु) लॉज (बॉम्बे ) २००८ २ ३६०*** व ***बाबूराव मारुती सावंत विरुध्द हनुमंत याडा नाईक व इतर, रिट याचिका क्र.२०८६/२०१३*** मधील निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणाला तंतोतंत लागु होतात.

२५. ***एकनाथ पुंजाजी घुबे विरुध्द डेपुटी कलेक्टर / सब डिव्हीजनल ऑफिसर बुलढाणा व इतर, रिट याचिका क्र.११३०/२०२०*** मधील निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणाला लागु होत नाही कारण मा.मुंबई उच्च न्यायालयासमोरील प्रकरणामधील नायब तहसिलदार यांनी स्थळ पाहणी केली होती व त्यांचा उलटतपास घेण्याची परवानगी विरुध्द पक्षाला देण्यात आली नव्हती. प्रस्तुत प्रकरणामध्ये तशी परिस्थिती नाही कारण स्थळ पाहणी अहवाल/टिप्पणी स्वतः तहसिलदार यांनी केल्याचे दिसुन येते. स्थळ पाहणी अहवाल/टिप्पणीवर

मा.तहसिलदार यांची सही आहे.

२६. येथे ही बाब नमुद करणे अत्यावश्यक आहे की, रस्ता केस एस.आर./१२/२०२० मधील अर्जदार क्र.४ पारुबाई आत्माराम सातपुते (प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.४) यांनी स्वतः हजर होऊन कैफियत व लेखी म्हणणे **निशाणी ७९** येथे दाखल केले. त्यामध्ये पारुबाई आत्माराम सातपुते यांनी असे स्पष्टपणे सांगितले आहे की, वाद मिळकतीतून कोणताही रस्ता केव्हाही अस्तित्वात नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.१,२,३ व ५ यांनी संगणमत करुन पारुबाई आत्माराम सातपुते यांच्या नावे दुस–या व्यक्तीस उभा करुन अर्जावर अंगठे उमठविले. उपरोक्त कारणामुळे रस्ता केस एस.आर./१२/२०२० मधील अर्जाच्या सत्यतेवर संशय निर्माण होतो.

२७. उपरोक्त कारणमिमांसेवरुन प्रथमदर्शनी मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय योग्य, बरोबर, कायदेशीर तसेच मामलेदार कोर्ट ॲक्ट मधील तरतूदीनुसार बरोबर आहेत असे म्हणता येत नाही. प्रतिवादी यांनी तथाकथित रस्त्याबाबत व अतिक्रमण व अडथळा बाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. तथाकथित रस्ता पुर्वापार अस्तित्वात होता व आहे हे देखील प्रथमदर्शनी सिध्द झाले नाही. उपरोक्त कारणमिमांसेवरुन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या हक्कात आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ वर **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

## मुद्दे क्रमांक २ व ३ बाबत :–

२८. मुद्दे क्रमांक २ व ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे व कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळणेकरीता दोन्ही मुद्दे एकत्र विचारात घेण्यात येत आहेत.

२९. मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय व आदेश मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील कायदेशीर तरतूदीनुसार योग्य व बरोबर नाही, असे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे. सदरील आदेश व न्यायनिर्णयाचा आधार घेऊन वादींच्या मालकी व वहिवाटीच्या दावा मिळकतीमध्ये तथाकथित अडथळा व अतिक्रमण दूर करणेचा प्रतिवादी यांना कोणताही कायदेशीर अधिकार पोहचत नाही. प्रतिवादी यांचे लेखी म्हणण्यामधील कथनांचे अवलोकन केले असता ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीमध्ये रस्ता असल्याचा दावा करीत आहेत. यावरुन प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीवरील कब्जात हरकत अडथळा निर्माण करण्याची धमकी देत आहेत, ही बाब संभाव्य वाटते. वादी यांनी त्यांचे अर्ज निशाणी ५ चे पृष्टयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी ६ दाखल केले आहे.

३०. मा.तहसिलदार खानापूर यांचे न्यायनिर्णय व आदेश प्रमाणे प्रतिवादींनी रस्ता निर्माण करणेचा व तथाकथित अडथळा दूर करणेचा प्रयत्न केल्यास वादींची हालअपेष्टा व गैरसोय (Hardship and inconvenience) होणार आहे. अर्ज निशाणी ५ मंजूर केल्यास प्रतिवादी यांची कोणतीही गैरसोय होणार नाही कारण तथाकथित रस्ता अस्तित्वात आहे किंवा कसे तसेच रस्त्यामध्ये अडथळा व अतिक्रमण आहे किंवा कसे, हे प्रथमदर्शनी सिध्द झाले नाही. वादींच्या शेतजमिनी म्हणजेच दावा मिळकतीमध्ये नवीन रस्ता निर्माण झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच त्यांच्या जमिनीमधील पिकांचे देखील नुकसान होणार आहे. ७/१२ उतारे चे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, वादी दावा मिळकतीमध्ये पिक घेत आहेत.

३१. उपरोक्त कारणमिमांसेवरुन मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो आहे की, वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी (*Prima-facie)* केस आहे, वादींच्या हक्कात सोयीचा समतोल (Balance of convenience) आहे. तसेच, तुर्तातूर्त मनाई हुकूम न

दिल्यास वादींचा न भरुन येणारा अथवा अपरिमित नुकसान (Irreparable loss) होणार आहे. उपरोक्त कारणांवरुन मी मुद्दे क्रमांक २ व ३ वरील निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**

३२. वरील मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत केलेल्या विवेचनांवरुन प्रस्तुत अर्जात तथ्य व गुण (Merit) असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचीत आहे म्हणून मी खालील आदेश पारित करीत आहे :–

## आ दे श

**अ**. वादी यांचा निशाण ५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**ब**. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेविरुध्द असा अंतरिम मनाई आदेश पारित करणेत येतो की, त्यांनी स्वतः अथवा इतर इसमांमार्फत रस्ता केस एस.आर./१२/२०२० मधील मा.तहसिलदार खानापूर यांचे न्यायनिर्णय दि.०७.१०.२०२२ चा आधार घेऊन दावा मिळकती गट क्र.२४४/२ व २५० मौजे नागेवाडी, ता.खानापूर, जि.सांगली मधील वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीत प्रस्तुत दाव्यामध्ये अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत हरकत अडथळा करु नये व उपरोक्त दावा मिळकतीमधुन बेकायदेशीरपणे रस्ता निर्माण करु नये.

**क.** अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाच्या अधीन राहील.

-

RAFEEQUE SHAIKH
Digitally signed by RAFEEQUE SHAIKH
Date: 2024.03.04 11:41:32 +0530

**दिनांक ०२/०३/२०२४.** **(रफिक अ. शेख)**

**ठिकाण विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,**

**ता.खानापूर, जि.सांगली**